क्र.२/नसवि/महासभा/ ०८ /२०११-२०१२
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ११ नोव्हेंबर २०११

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०८ /२०११-२०१२

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,

मा. ----------

सदस्य/सदस्या,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर **महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १९/११/२०११ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि. २०/१०/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
   अ) दु:खवटयाचे ठराव.
   ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. सांगली शहरातील हिराबाग वॉटर वर्क्स येथील सहा झाडांचा जागेवर जाहिर लिलाव दि.१७/०८/२०११ रोजी आयोजित केला होता. सदर सहा झाडांच्या जाहिर लिलावामध्ये एकूण दहा लिलाव धारकांनी भाग घेतला होता. त्यामध्ये श्री.अरुण यशवंत लोंढे यांनी लिलावाची सुरुवात रु.९००/- मात्रला करुन लिलावाचा शेवट त्यांनीच रु.३५,७००/- मात्रला केला आहे. सदरचा लिलाव त्यांचे नावे दोनवार केला आहे. सहा झाडांसाठी लिलाव र.रु.२००००/- ते २५,०००/- येतील असा अंदाज होता परंतु, लिलाव दरामध्ये झालेल्या चढाओढीमुळे सदर लिलावास आलेली रक्कम अंदाजीत रक्कमेपेक्षा जादाची आहे. तरी सदरचा लिलाव श्री.अरुण यशवंत लोंढे यांचे नावे तीनवार अंतरावर मान्यतेसाठी उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.१८/१०/२०११ चे विषयपत्र.

५. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

६. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :-१९/११/२०११

ठराव क्रमांक :- १५८

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण महासभा दि. २०/१०/२०११ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१४३ ते ठराव क्र.१५७ सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

कार्यालय अधीक्षक (म.स.)

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०८ दिनांक :- १९/११/२०११

ठराव क्रमांक :- ९६५

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.१८/१०/२०११ चे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

सांगली शहरातील हिराबाग वॉटर वर्क्स येथील सहा झाडांचा जागेवर जाहिर लिलाव दि.१७/०८/२०११ रोजी आयोजित केला होता. सदर सहा झाडांच्या जाहिर लिलावामध्ये एकूण दहा लिलाव धारकांनी भाग घेतला होता. त्यामध्ये श्री.अरुण यशवंत लोंढे यांनी लिलावाची सुरुवात रु.१००/- मात्रला करुन लिलावाचा शेवट त्यांनीच रु.३५,७००/- मात्रला केला आहे. सदरचा लिलाव त्यांचे नावे दोनवार केला आहे. सहा झाडांसाठी लिलाव र.रु.२००००/- ते २५०००/- येतील असा अंदाज होता परंतु, लिलाव दरामध्ये झालेल्या चढाओढीमुळे सदर लिलावास आलेली रक्कम अंदाजीत रक्कमेपेक्षा जादाची आहे. तरी सदरचा लिलाव श्री.अरुण यशवंत लोंढे यांचे नावे तीनवार अंतरावर मंजूर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

उपायुक्त अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका